# बृहन्मुंबई महानगरपालिका
## परिपत्रक २०२०-२१

क्रमांक:प्रले/एफडीटी/ १५ दिनांक: 30.08.2020

**विषय** : कोविड-१९ च्या उपाययोजनांकरीता नगरसेवक निधीमधून रु.१० लाखापर्यंतचा खर्च करण्याबाबत तसेच आमदार निधी व जिल्हा नियोजन समिती यांच्या निधीमधून खर्च करण्याबाबत.

संदर्भ : १) प्रले/एफडीटी/ १३ दिनांक: २०.०४.२०२०
२) प्रले/एफडीटी/ १४ दिनांक: २२.०४.२०२०
३) रुग्ण संख्येबाबत महाराष्ट्र शासनाने केलेला अंदाज अहवाल (पीपीटी)
४) एमजीसी/ए/ ३१३८ दि.२४.०४.२०२०

---

राज्य शासनाने Epidemic Disease Act 1897 अंतर्गत तसेच Prevention of Spread of Dangerous Disease Act under MMC Act 1888 अंतर्गत कोरोना व्हायरस मुंबई शहरामध्ये Epidemic म्हणून घोषित केला आहे. देशामध्ये तसेच मुंबई शहरामध्ये कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे. सद्यस्थितीमध्ये मुंबईमध्ये कोरोना बाधित रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या कोरोना विषाणूने थैमान घातले असून त्यामुळे उद्भवलेली परिस्थिती अधिकच चिंतेची बाब बनली आहे. मुंबई शहरामध्ये रुग्णांची वाढणारी संख्या लक्षात घेता सद्यस्थितीत आरोग्य विभागास उपलब्ध झालेल्या तरतूदीचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे.

संदर्भ क्र. ३ मधील रुग्ण संख्येबाबत महाराष्ट्र शासनाने केलेला अंदाज अहवाल (पीपीटी) मध्ये नमूद केल्या नुसार मुंबई मधील कोवीड-१९ चा प्रादुर्भाव भविष्यात मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्याप्रमाणात पायाभुत सुविधा उदा. विलगीकरण कक्षांची व्यवस्था करणे , आयसीयू बेड्स, व्हेंटीलेटर्स, कोवीड-१९ अंतर्गत अतिरिक्त रुग्णालये, इतर वैद्यकिय उपकरणांची आणि यंत्र संयत्रांची खरेदी तसेच त्याप्रमाणात डॉक्टर्स, नर्सेस, पॅरामेडीकल स्टाफ इत्यादींची व्यवस्था करणे आवश्यक आहे

कोरोनाचे संकट लक्षात घेता मुंबईतील सर्व आमदारांकडून व सर्व नगरसेवकांकडून त्यांच्या प्रभागातील नागरीकांना कोरोना रोगापासून सूरक्षा व कोरोना नियंत्रित करुन त्यावर उपाययोजना करण्याकरीता आमदार निधी व नगरसेवक निधी खर्च करण्याकरिताची मागणी होत आहे.

मुंबईतील नगरसेवकांच्या मागणीनुसार परिपत्रक क्र. प्रले/एफडीटी/१३ दिनांक: २०/०४/२०२० व प्रले/एफडीटी/१४ दिनांक: २२/०४/२०२० अन्वये तातडीने रु.१० लाखा पर्यंत नगरसेवक निधी वापरण्याकरीता व सदर निधी कोणत्या बाबींवर खर्च करावा याबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसारीत करण्यात आली आहेत.त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१. रुग्णांसाठी मोठया प्रमाणावर अलगीकरण व्यवस्था तयार करून देणे. त्यामध्ये बेड्स लॉकर्सची सुविधा करणे.
२. कोविड-१९ अंतर्गत काम करणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षणार्थ पीपीई किट,

एन-९५ मास्क, ग्लोव्हज, सॅनिटायझर, डिसइन्फेक्टेड पावडर यासारखे मटेरीयल घेणे.

३. महानगरपालिकेच्या रुग्णालयांत मिनी ऑक्सिजन सिलेंडर, डिजीटल थर्मल स्कॅनर, स्टेथेस्कोप, ग्लुकोमिटर पल्स ऑक्सिमिटर फींगर यासारखे साहित्य घेणे.

**सदर परिपत्रकामधील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये खालील बाबींचा नव्याने समावेश करण्यात येत आहे.**

४. ऑक्सिजन हायप्रेशर सिलेंडर आणि ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, Pulse oxymeter, Infra red Thermal gun.

५. शाळांमध्ये तसेच गलिच्छ वस्त्यांमध्ये तात्पुरत्या टॉयलेटस ची व्यवस्था करणे.

६. डायलसिस मशीन , आरओ प्लांट ,

मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवकांना नगरसेवक निधी महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येतो तद्अनुषंगाने सन-२०२०-२१ च्या अर्थसंकल्पात नगरसेवक निधीची तरतुद करण्यात आलेली आहे.तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आमदार निधी साठी देखील सॅप संगणकीय प्रणालीमध्ये नव्याने स्वतंत्र लेखाशिर्षे निर्माण करण्यात आलेली आहेत.

मुंबईतील मान. आमदारांनी त्यांच्या विधानसभा क्षेत्रातील नागरिकांना कोवीड-१९ रोगा पासून सुरक्षा नियंत्रण व त्यावर उपाय योजना करण्याकरिता वरील सहा बाबींवर खर्च करण्याची मागणी संबंधित जिल्हाधीकारी यांना केल्यास व त्यावर त्यांनी प्रशासकीय मान्यता देवून महानगरपालिकेस निधी वर्ग केल्यास तसेच जिल्हा नियोजन समिती मार्फत देखील निधी उपलब्ध करुन दिल्यास महापालिकेला कोव्हिड -१९ च्या खर्चासाठी हातभार लागेल.

सदर खरेदी ही मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत निर्गमित केलेल्या दरपत्रिकेनुसार करणे आवश्यक आहे.

सर्व खातेप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांनी याची नोंद घ्यावी व महाराष्ट्र शासनाच्या याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांस अधिन राहून कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| 29.4.2020<br>कार्यकारी आरोग्य आधिकारी | प्रमुख लेखापाल (वित्त) प्र. | 29/4<br>उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) |
| अतिरिक्त आयुक्त (प.उप.) | अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) | महानगरपालिका आयुक्त |